Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंकः २० ● पृष्ठः ४ ● मुंबई, मंगळवार १४ ऑगस्ट २०१८ ते सोमवार २० ऑगस्ट २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

३ | शेती कामांना हेक्टरी २५ हजाराचे अनुदान द्या

गुजरातचे मुंद्रा बंदर अतिरेक्यांचे लक्ष्य ? | ४

## थोडक्यात महत्वाचे

### दहावीच्या विद्यार्थ्याने वडिलांचे ४६ लाख चोरुन मित्रांमध्ये वाटले!

**भोपाळ (केदार वाजे)-** मध्य प्रदेशमध्ये दहावीत शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने फ्रेण्डशीप डे फारच अनोख्या पद्धतीने साजरा केला. त्याने आपल्या वडिलांचे ४६ लाख रुपये मित्रांना दान केले. आता ही रक्कम परत मिळवण्याचं काम पोलिसांच्या मदतीने सुरु आहे.संबंधित विद्यार्थ्याने एका कामगाराच्या मुलाला सरसकट १५ लाख रुपये दिले, तर गृहपाठ



करण्यात मदत करणाऱ्या मित्राला त्याने तीन लाखांची मदत केली. 'टाइम्स ऑफ इंडिया' वृत्तपत्राने याविषयी बातमी दिली आहे.दानधर्म करणाऱ्या मुलाचे वडील व्यवसायाने बिल्डर आहेत. प्रॉपर्टी विक्रीतून मिळालेली ६० लाखांची रोकड त्यांनी कपाटात ठेवली होती. मात्र ही रक्कम अचानक सापडेनाशी झाल्यामुळे त्यांनी पोलिसात तक्रार दाखल केली.बाहेरच्या व्यक्तीने चोरी केल्याची शक्यता पोलिसांना वाटत नव्हती. अखेर त्यांना हे गूढ उकलण्यात यश आलं. मात्र त्याने हे पैसे का वाटले, हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.विद्यार्थ्याकडून रोकड मिळालेल्या एकाने नवीन कार विकत घेतली, तर १५ लाख मिळालेला कामगाराचा मुलगा बेपत्ता आहे.

### आधी मैदानाची सफाई, नंतर रेडिओ विक्री, अर्जुनचं सर्वत्र कौतुक

**लंडन (हर्षद परब)-** मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा लेक अर्जुन पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. निमित्त क्रिकेटचंच आहे. पण या वेळी स्वत: अर्जुन क्रिकेट खेळत नाही. भारत आणि इंग्लंड संघांमधल्या लॉर्डस कसोटीत पावसाचा वारंवार अडथळा आला.त्यावेळी मैदानातल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी लॉर्डसच्या ग्राऊंड्समनसोबत अर्जुनही प्रयत्न करताना दिसला. त्याच्या या कामाचं सोशल मीडियावरही कौतुक झालं. पण अर्जुन इतकंच करुन थांबला नाही,



त्यानं लॉर्डसच्या बाहेर रेडिओचीही विक्री केली. हरभजनसिंगनं त्याचा रेडिओ विकतानाचा फोटो सोशल मीडियावरून शेअर केला आहे.अर्जुन तेंडुलकर शनिवारी स्टेडियमबाहेर डिजीटल रेडिओ विकत होता. डिजीटल रेडिओ एक इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे, ज्याद्वारे लाईव्ह कॉमेंट्री प्रसारित केली जाते. त्याद्वारे क्रिकेटप्रेमी ताजे अपडेट जाणून घेऊ शकतात. या रेडिओचे सिग्नल मर्यादित जागेत उपलब्ध असतात.

### भारताच्या स्वातंत्र्य दिनाचा ऑस्ट्रेलियात जल्लोष

**मेलबर्न (सुनील आढाव)-** स्वातंत्र्य दिन साजरा करण्याची उत्सुकता जितकी देशातील भारतीयांना असते तितकीच ती परदेशातील भारतीयांनादेखील असते. देशभरात



१५ ऑगस्टची तयारीची लगबग सुरु असताना, तिकडे ऑस्ट्रेलियातील मेलबर्नमध्ये नुकताच ध्वजारोहण सोहळा पार पडला.मेलबर्नमध्ये अनेक कार्यक्रम आठवड्याच्या शेवटी पार पडतात. त्यामुळे मेलबर्नमध्येही १५ ऑगस्टच्या कार्यक्रमांसाठीची सुरुवात शहरातल्या फेडरेशन स्क्वेअरवर ध्वजारोहण करुन झाली.अभिनेत्री राणी मुखर्जीच्या हस्ते ध्वजारोहण झालं आणि यानंतर मेलबर्न इंडियन फिल्म फेस्टिव्हला सुरुवात झाली. मराठमोळ्या ढोल ताशांच्या गजरात मेलबर्नमधील फेडरेशन स्क्वेअर दुमदुमून गेला होता.

### निर्दयी पतीने किरकोळ कारणावरुन पत्नीचं नाक चावलं

**लखनौ (दयानंद गुप्ता)-** किरकोळ कारणावरुन पतीने पत्नीचं नाक चावल्याची घटना उत्तर प्रदेशमधील शाहजहांपूरमध्ये घडली आहे. रक्ताने माखलेल्या पत्नीला नातेवाईकांनी गंभीर अवस्थेत जिल्हा रुग्णालयात दाखल केलं. पूजा असं जखमी महिलेचं नाव आहे.तीज या सणासाठी बाजारातून बांगड्या आणताना पूजाचं तिचा पती अर्जुनसोबत रस्त्यातच वाद झाला. यानंतर रागावलेल्या अर्जुनने महिलेचं नावं चावलं. यामध्ये पूजा गंभीर जखमी झाली असून तिच्या नातेवाईकांनी रुग्णालयात दाखल केलं.'पती अर्जुन माझ्यावर संशय घेत असे. दारु पिऊन कायम मारहाण करत असे. मारहाणीला विरोध केल्यावर सासरची मंडळी दरदिवशी मला मारायचे. या कृत्यात सासू, दीर, जाऊ हे पतीला सहकार्य करायचे,' असं पूजाने सांगितलं.

## ओढ तुझ्या आगमनाची...



गणपती बाप्पाच्या आगमनाची ओढ सर्वांनाच लागलेली असते. उत्सव एक महिन्यावर येऊन ठेपला असून, मूर्तीकारांनी आपापली दुकाने सजवली आहेत, रंग कामाची लगबग सर्व ठिकाणी पहायला मिळत आहे. अशाच एका मूर्तीकाराच्या दुकानात मूर्त्यांना रंगाची उजळण दिली जात असतानाचा फोटो टिपला आहे आमच्या वृत्तपत्राचे फोटो ग्राफर योगेश होळंब यांनी.

## मुंबईतील बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाची रहिवाशांना चिंता

**मुंबई (महेश काळे)-** ना. म. जोशी मार्ग, नायगाव, वरळी इथल्या बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचा प्रश्न सध्या मार्गी लागत असल्याचे चित्र आहे खरे. पण, याच पुनर्विकासाच्या मुद्द्याबाबत शिवडीतील बीडीडीवासीयांना चिंता सतावते आहे. रहिवाशांच्या चिंतेच काय कारण आहे? त्यांच काय म्हणण आहे? याचा आढावा घेणारा हा रिपोट...शिवडीत एकूण पाच एकर जागेत बारा बीडीडी चाळी, नऊशे साठ खोल्या. शंभरीकडे झुकलेल्या या बीडीडी चाळींची अवस्था आज दयनीय आहे. त्यामुळे म्हाडाकडून बीडीडी चाळींचा होत असलेला पुनर्विकास इथल्या रहिवाशांना हवा आहे. मात्र यात मुख्य अडसर आहे तो मुंबई पोर्ट ट्रस्टचा. कारण, या चाळी पोर्ट ट्रस्टच्या जागेवर उभ्या आहेत. त्यामुळे ही जागा राज्य सरकारकडे जोपर्यंत हस्तांतरित होत नाही तोपर्यंत इथल्या पुनर्विकासाला चालना मिळणार नाही.दरम्यान, शिवडी बीडीडीकरांच्या या प्रश्नी म्हाडाने जागा हस्तांरनासंदर्भात मुंबई पोर्ट ट्रस्टकडे पत्रव्यवहार केलाय.



## मुंबई मेट्रोची मार्गिका ठरवण्याचा अंतिम निर्णय आमचाच -एमएमआरसीएल

**मुंबई (विशाल कारंडे)–** मेट्रो-२बी चा अंतिम आराखडा ठरवल्यानंतर स्थानिक रहिवाश्यांचा अभिप्राय घेतला होता का? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयानं सोमवारी उपस्थित केला. याच प्रश्नाला उत्तर देताना 'मेट्रोची मार्गिका ठरवताना स्थानिक रहिवाशार्शी चर्चा करणं गरजेचं नाही, कायद्यानुसार आम्हांला अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार आहे.' असं एमएमआरसीएलच्या वतीनं हायकोर्टाला देण्यात आलं. हायकोर्टाने एमएमआरसीएलच्या वक्तव्यावर असमाधानता व्यक्त केली. पण वेळेअभावी हायकोर्टानं या प्रकरणाची सुनावणी २४ ऑगस्टपर्यंत तहकूब केलीय.जुहू-विलेपार्ले



रहिवासी संघाने मेट्रो २बी संदर्भात हायकोर्टात जनहित याचिका दाखल केलीय. जेव्हीपीडी परिसरातून जाणा-या मेट्रो-२ बी च्या मार्गिकेचं भुयारीकरण करण्यात यावं अशी मागणी करणारी याचिका आहे.परिसरात होणारा ट्राफिकचा प्रश्न मेट्रोच्या कामामुळे अधिक गंभीर होईल असा दावा या याचिकेत करण्यात आलाय. यावर आक्षेप घेत मुंबई मेट्रो रेल प्राधिकरणानं, मेट्रोची मार्गिका ठरवण्याचा अधिकार हा प्रशासनाचा असल्याचे स्पष्ट केलंयं.आराखड्यानुसार मेट्रो २ बी ची मार्गिका ही उन्नत मार्गावरून जाणार आहे. ठराविक विभागातील स्थानिक रहिवाश्यांना त्रास होईल म्हणून मार्गात बदल करणं योग्य नाही.

## धनगर समाजाचा राज्यभर एल्गार, ठिकठिकाणी रास्तारोको

**मुंबई (सम्यक कासारे)-** धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये आरक्षण द्यावं या मागणीसाठी आज राज्यभरात धनगर समाजाचं आंदोलन सुरु आहे. धनगर समाजाने ठिकठिकाणी रास्तारोको करुन सरकारचा निषेध केला आहे.धनगर आणि धनगड अशा दोन वेगळ्या जाती असल्याचा सरकारचा दावा आहे. तसं प्रतिज्ञापत्र आदिवासी विकास मंत्री विष्णू सावरा यांनी हायकोर्टात दिलं. मात्र धनगर आणि धनगड ही फक्त प्रशासकीय चूक आहे. राज्यात एकही धनगड अस्तित्वात नाही. त्यामुळे १ सप्टेंबरच्या आत ही चूक दुरुस्त केली नाही तर ५ लाख धनगर मिळून औरंगाबादेत एल्गार पुकारतील असा इशारा धनगर समाजाने यापूर्वीच दिला होता.आघाडी सरकारच्या काळात हा प्रश्न पेटला तेव्हा देवेंद्र फडणवीस स्वत: धनगरांच्या व्यासपीठावर गेले. त्यांनी सत्तेवर आल्यानंतर पहिल्या



मंत्रिमंडळ बैठकीत हा प्रश्न सोडवू असं आश्वासन त्यांनी दिलं. मात्र ४ वर्ष झाली तरी फडणवीसांनी धनगर आरक्षणाचं घोंगडं भिजत ठेवल्याचा आरोप आहे.

- बॉम्बे रजिस्ट्रेशन अक्टमध्ये 'धनगर' ऐवजी 'धनगड' असा उल्लेख
- प्रत्येक राज्यात उच्चार धनगर असो किंवा धनगड, अर्थ समान असल्याचा दावा
- वर्षानुवर्षे धनगरांचा मेंढीपालनाचा व्यवसाय
- नृत्य, गायन, देव-देवतांसंदर्भात धनगरांची खास संस्कृती
- मानववंश शास्त्र आणि सामाजिक दृष्ट्या धनगर भटकी जमात असल्याचा उल्लेख
- समाजाचा समावेश आदिवासी जमातीत का नाही, असा प्रश्न भटक्या विमुक्तांच्या अभ्यासकांनी केला
- बिहार आणि झारखंडमध्ये धनगरांचा समावेश आदिवासी जमातीत

## पोटच्या गोळ्याची तीनं नाल्यात बुडवून केली हत्या; नरबळीचा संशय

**भिवंडी (राकेश गायकवाड)-** चिमुकल्याच्या रडण्याला कंटाळलेल्या मातेनं त्यांची नाल्यात बुडवून हत्या केल्याची धक्कादायक घटना भिवंडी तालुक्यात घडली. सहा महिन्याच्या आजारी चिमुकला सतत रडून त्रास देत असल्याने या निर्दयी मातेनं कासपाडानजीकच्या मोठ्या नाल्यात त्याचा जीव घोटला. नरबळीचा संशय व्यक्त होत असल्याने पोलीस त्या दिशेनेही तपास करीत असल्याची माहिती सूत्राने दिली. या प्रकरणी निर्दयी मातेला भिवंडी तालुका पोलिसांनी गजाआड केले आहे. कल्पना निलेश गायकर (२५) असे निर्दयी मातेचे नाव आहे. तर वृषभ असे हत्या करण्यात आलेल्या चिमुकल्याचे नाव आहे. विशेष बाब म्हणजे, आरोपी कल्पनाचा नवरा निलेश हा धन, पैसा मिळेल या लालसेने तंत्रमंत्र, बुआबाजीच्या आहारी गेल्याची माहिती समोर आली असून हा प्रकार नरबळीचा असावा? असा



कयास गावकऱ्यांकडून लावला जात आहे.पोलीस सूत्रानुसार निर्दयी माता कल्पना हि पती व दोन मुलांसह तालुक्यातील कोळिवली (धापसीपाडा) येथे राहत असून, चिमुकल्यावृषभचा मृतदेह ८ ऑगस्ट २०१८ रोजी सायंकाळच्या सुमाराला तालुक्यातील कासपाडानजीकच्या रस्त्यालगत असलेल्या नाल्यात आढळून आला होता. मृतक वृषभ सर्दी, खोकला व तापाने आजारी असल्याने त्याच्यावर वैद्यकीय उपचार करण्याऐवजी तंत्र मंत्राने इलाज सुरु असल्याने त्याची प्रकृती खूपच गंभीर झाली होती. त्यामुळे तो सतत जोरजोराने रडत होता. त्याच्या रडण्याने त्रस्त झालेल्या कल्पना हिने कवाड (नित्यानंद नगर) येथील माहेर गाठले व बाळाला नाल्याच्या ओहळाच्या पाण्यात नेवून बुडवले. त्यानंतर तिने आईवडिलांकडे येवून मुलाला कोणीतरी बुडवले आहे. असे सांगून दुष्कृत्य लपवण्याचा प्रयत्न केला. मात्र, शेजाऱ्यांनी तिच्यावर संशय व्यक्त करून याची खबर तालुका पोलिसांना दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी स्व. इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात पाठवला होता. त्यानंतर वैद्यकीय अहवालानूसार भिवंडी तालुका पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र चिमुकल्याच्या शवविच्छेदनाच्या अहवालात त्याचा पाण्यात बुडवून मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे तालुका पोलीस ठाण्याचे एपीआय महेश सांगडे यांनी दाखल केलेल्या फिर्यादीनूसार तालुका पोलिस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून परिसरातील स्थानिक नागरिकांकडे गुप्त चौकशी केली.

## रेल्वे पोलिस भरतीत महिलांना ५०% आरक्षण -गोयल

**पाटणा (केदार कोल्हे)-** पोलिसात रुजू होण्याची इच्छा असलेल्या तरुणींसाठी केंद्र सरकारने गुड न्यूज दिली



आहे. रेल्वे पोलिस भरतीत महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याची घोषणा रेल्वेमंत्री पियुष गोयल यांनी केली आहे.रेल्वे खात्यातच आणखी एक लाख ३० हजार नोकऱ्या उपलब्ध असल्याची माहितीही गोयल यांनी दिली. विशेष म्हणजे मुलाखतीविना फक्त संगणकीय परीक्षा देऊन उमेदवारांना नोकरी मिळवता येणार आहे. भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं गोयल यांनी सांगितलं. साडेनऊ ते दहा हजार आरपीएफ जवानांची भरती नजीकच्या काळात होणार आहे. त्यापैकी ५० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित असतील. गोयल यांच्या निर्णयामुळे रेल्वे पोलिसात नोकरीचं स्वप्न पाहणाऱ्या तरुणींना दिलासा मिळाला आहे. रेल्वे मंत्रालयातर्फे पाटण्यात आयोजित एका कार्यक्रमात गोयल यांनी रोजगाराची हमी दिली.

## सौजन्य व्हॉट्सअप




## करोडो लीटर पाणी वाचविणारी राज्यातील एकमेव पालिका

**धुळे (सुनील आढाव)-** पाण्याचा अपव्यय करणारी नव्हे तर करोडो लिटर पाणी वाचवणारी राज्यातील एकमेव नगरपालिकेबद्दल तुम्हाला



माहितेय का ? या पालिकेने पाण्याचे मीटर बसवून नागरिकांना २४ तास पाणी उपलब्ध करून देत असताना महिन्याला सहा कोटी लिटर पाण्याची बचत सुरु केली आहे. राज्यात ऐन पावसाळ्यात पाणी टंचाईचा सामना करणाऱ्या जलसंपन्न आणि जलसाक्षर म्हणून शिरपूर पालिकेची ओळख निर्माण झालीयं. धुळे जिल्ह्यातील शिरपूर नगरपालिकेने शिरपूरच्या प्रत्येक घराला पाणी मीटर बसविल्याने दिवसाकाठी या पालिकेने २० लाख लिटर पाण्याची बचत सुरु केली आहे. नागरिकांना मुबलक आणि २४ तास पाणी उपलब्ध करून देत असताना मीटर लावून पाणी दिल्याने नागरिकांना पाण्याचं महत्व पटले आहे.

## कार डीलरचा व्यवसाय करत राजू मिश्रा लोकांना लावतो लाखोंचा चूना

**मीरा रोड (प्रतिनिधी)-** इंपोर्टेड कार डिलर आणि सिवील चिटर हा पूजा ऑटो गॅलरीचा मालक ओडील रायकरण मिश्रा उर्फ राजू मिश्रा (वय ८८) आहे. मूळ बिहारचा राहणारा असून आता मिरा रोड येथे कार डिलरचा व्यवसाय करत आहे. त्याचे ऑफिस हे क्वीन्स पार्क येथे आहे. त्याने मोठे इंपोर्टर्डेड गाडी येणारे व मोठे बिझनेसमन ह्यांची फसवणूक केली आहे.



संपूर्ण भारतभर करोड़ों रुपयांची फसवणूक केली आहे. त्याची फसवण्याची पद्धत ही अशी आहे तो गाडी विकून त्या गाडीची विक्री केलेली रक्कम ही आपल्या खात्यात न घेता वेगवेगळ्या नावाने व वेगवेगळ्या खात्यात घेतो व लोकांना करोड़ो रुपयांना चूना लावतो. त्यानंतर तो खोटी तक्रार करून गाडी घेणाऱ्यावर गुन्हा दाखल करतो व गाडी पोलिस स्टेशनला जमा करून घेणाऱ्याला घाबरून त्याच्याकडून अजून जास्त पैशाची मागणी करतो.

आता काही दिवसांपूर्वी त्याने नवघरच्या एका व्यापाऱ्याची मर्सिडीज गाडी पोलिस स्टेशनला खोटी तक्रार दाखल करून जमा केली व त्याच्याकडे अजून पैशांची मागणी केली. या व्यतिरिक्त राजू मिश्रा लोकांचा विश्वास संपादन करून त्यांच्या महागड्या गाड्या विकण्यास घेऊन त्याची खोटी कागदपत्रे बनवून दुसऱ्या राज्यात विकतो व जेव्हा गाडीमालक पैसे मागतो तेव्हा त्याला खोटी कारणे सांगून पैसे देण्यास टाळाटाळ करतो. राजू मिश्राच्या नावे ४ गुन्हे दाखल असून बरिचश्या तक्रारी सुद्धा दाखल झाल्या आहेत. वेगवेगळ्या राज्यात गुजरात, हरियाणा, पंजाब, महाराष्ट्र या ठिकाणी गुन्हे दाखल असून बऱ्याच गुन्ह्यात पोलिस शोध घेत आहेत व सध्या तो गुन्ह्यामध्ये बेल वर बाहेर आहे.

# संपादकीय..

संपादक:- राकेश शंकर गोरे

## आक्रमक समाज, हतबल सरकार

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचे 'ठोक मोर्चा' हे नाव सार्थ करण्याची चढाओढ मोर्चाच्या स्थानिक नेत्यांमध्ये लागलेली दिसते. मराठा नेत्यांच्या शांततेच्या आवाहनाला कुणी जुमानले नाही. चाकणमध्ये आंदोलन अचानक उग्र झाले. तसाच प्रकार नवी मुंबईत घडला. त्यानंतर मोर्चाच्या आयोजकांनी शहाणे होण्याची गरज होती.

मुख्यमंत्र्यांचे आवाहन, न्यायालयातील सुनावणी व सूचना तसेच सरकारचे अन्य प्रयत्न पाहता नोव्हेंबरपर्यंत आंदोलन स्थगित ठेवण्यास हरकत नव्हती. तसे झाले नाही. आता आंदोलन नेत्यांच्या हातातून निसटले व स्थानिक पातळीवर तरूणांनीच ते हातात घेतले असे सांगितले जाते. पण ही वेळ आंदोलनाच्या बदलत्या स्वरूपामुळे आली. सरकारशी सतत वाटाघाटी करून सरकारवर दबाव टाकण्यासाठी वरिष्ठ समिती बनविण्याची गरज होती. या समितीच्या मार्फत मराठा समाजाशी सतत संवाद राहिला असता. दुर्दैवाने याबाबत कोणीच पुढाकार घेतला नाही. यामुळे आंदोलन निर्णायकी होत चालले. त्यात भाजपमध्येही याबाबत टीम वर्कने काम होताना दिसत नाही आणि काँग्रेस तसेच राष्ट्रवादी काँग्रेसलाही या विषयाच्या राजकीय पैलूत अधिक रस आहे. परिणामी हे आंदोलन निर्नायकी होत गेले आणि आता त्यावर अंकुश ठेवणारे समर्थ नेतृत्व राहिलेले नाही. अर्थात विश्वासार्ह समर्थ नेतृत्वाचा अभाव हे सध्या भारताचे मोठे दुखणे झाले असून महाराष्ट्र त्याला अपवाद नाही.

मराठा आरक्षणाची मागणी न्याय आहे व ते देण्याशिवाय सरकारला गत्यंतर नाही. हे माहित असूनही आंदोलकांनी उतावीळ का व्हावे आणि सरकारनेही हतबलता का दाखववावी, हा प्रश्न अन्य सर्व नागरिकांना पडतो. आरक्षण मिळाले तरी नोकऱ्यांची वानवा राहणार हे सर्वांना ठाऊक आहे. फक्त खासगी क्षेत्रातच नोकऱ्या मिळू शकतात व तेथेही कौशल्य असणाऱ्यांनाच काम मिळेल. पण आता आंदोलकांचा हातोडा कंपन्यांवरही पडला. औरंगाबादमध्ये साठहून अधिक कंपन्यांची तोडफोड करण्यात आली. त्यामागे आंदोलनातील कार्यकर्ते नसतीलही पण हे हल्ले सुनियोजित रितीने झाले असे सीसीटीव्हीवर दिसते.

शेतीला पर्याय कारखानदारी हाच आहे. ती कशी वाढेल आणि त्यातून जास्तीत जास्त रोजगार आपल्या तरूणांना कसा मिळेल याकडे समाजनेत्यांचे लक्ष हवे. पण इथे उफराटा कारभार सुरू झाला. कारखानदारी, पुरक उद्योग याबद्दल सजग असलेले



नेतेही औरंगाबादमधील घटनेनंतर आंदोलकांना चार शब्द सुनविण्यास पुढे आले नाहीत. याउलट औरंगाबादमधील उद्योजकांनी त्वरीत निषेध केला आणि असले प्रकार थांबले नाहीत तर उद्योग उभारणीचा पुनर्विचार करावा लागेल असे स्पष्ट शब्दात सांगितले. सामाजिक वा राजकीय आंदोलनावर उद्योजक सहसा स्पष्ट भूमिका घेत नाहीत. पण तो धोका पत्करण्यास उद्योजक तयार झाले यावरून बिघडलेल्या परिस्थितीची कल्पना यावी. खुंटलेले औद्योगिकीकरण हे मराठवाड्याचे मोठे दुखणे आहे. कचरा, पाणी यामुळे आधीच उद्योग मंदावले आहेत. आता अशांत वातावरणामुळे ते दूर जाणार असतील तर नोकऱ्या मिळणार कोठून याचा विचार सरकारबरोबर आंदोलकांनी केला पाहिजे.

सरकारची हतबलता ही अधिक गंभीर बाब आहे. आंदोलन चिघळू नये म्हणून बळाचा वापर न करण्याच्या सूचना सरकारकडून दिल्या गेल्या. ते योग्य असले तरी त्याचा परिणाम असा झाला की पोलीस तटस्थ राहिले. मराठा आरक्षणासाठी आवश्यक ती सर्व पावले सरकार उचलीत असताना आणि फडणवीस सरकारला जनमताचे उत्तम समर्थन मिळत असल्याचे दाखले जळगाव, सांगलीतून मिळाले असताना सरकार म्हणून मुख्यमंत्र्यांनी कणखर भूमिका घेणे आवश्यक होते. सरकार जितके संवेदनशील असावे तितकेच कणखर असावे लागते. या कणखरपणाचा अभाव सध्या सर्वत्र दिसून येत आहे. बहुसंख्यांकांनी कायदा हातात घेण्यास सुरुवात केली की लोकशाहीची दुर्दशा होण्यास वेळ लागत नाही. सध्या झुंडशाहीचा अवलंब करून कोणत्याही नियमांना, कायद्यांना, चौकटींना म्हणजेच लोकशाही व्यवस्थेला झुगारून देण्यास सुरुवात झाली आहे. न्यायालयेही यातून सुटलेली नाहीत. अशा वेळी नागरिकांनी पहायचे कुणाकडे? की झुंडींपुढे झुकायचे हा प्रश्न आहे.

झुंड शिरजोर झाली की अर्थव्यवस्था बुडणार, यात शंका नाही. अर्थव्यवस्था कोलमडली की रोजगार कोठे मिळणार? आरक्षणाच्या कागदाने काही हजारांना सरकारी नोकऱ्या मिळतील पण रस्त्यावर उतरलेल्या लाखो तरूणांचे पोट भरण्यासाठी कारखानदारीच आवश्यक आहे. आंदोलकांनी याचा शांतपणे विचार करावा आणि आंदोलन गुंडापुंडांच्या ताब्यात जाणार नाही याची दक्षता घ्यावी. आंदोलनात शिरलेल्या गुंडांना पकडण्यासाठी पोलीसांना मदत करण्याचे स्वागतार्ह पाऊल पुण्यातील आंदोलकांनी उचलले. अशा गुंडावरील गुन्हे मागे घेण्याची मागणी करू नये. दुसऱ्या बाजूला सरकारनेही हतबलता झटकावी आणि कायदा व सुव्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे.

## पुन्हा सनातनच का?

एटीएस अर्थात दहशतवादविरोधी पथकाने नालासोपारा भागातील वैभव राऊत याच्या घरावर तसेच एका दुकानावर छापा टाकला. त्या वेळी तेथे ८ देशी बॉम्ब तसेच २० पेक्षा जास्त बॉम्ब तयार केले जाऊ शकतात एवढी गनपावडर तसेच डिटोनेटरही ही सापडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. तपासात या स्फोटकांची व्याप्ती मोठी असल्याचे निष्पन्न झाले. सायंकाळपर्यंत याप्रकरणी चाललेल्या कारवाईत या कटात सहभागी असलेले आणखी दोघे ताब्यात घेण्यात आले. यानिमित्ताने राज्यातील मोठा घातपाताचा कट उधळला गेल्याचे समोर आले आहे. गेल्या काही दिवसांपासून एटीएसला वैभववर संशय होता. त्यानुसार त्यावर पाळत ठेवून पोलिसांनी 'डॉग स्कॉड' आणि 'फॉरेन्सिक टीम'च्या साहाय्याने ही कारवाई केली. देशविघातक कारवाईसाठी उपयोगात येऊ शकणारी मोठ्या प्रमाणावरील घातक स्फोटके या माध्यमातून पोलिसांनी शोधली. पण ही कारवाई होताच कोण हा वैभव राऊत, हा प्रश्न समोर आला. कारवाईसोबतच तो 'सनातन' या बहुचर्चित संस्थेचा साधक असल्याची तसेच तो पकडल्याची चर्चा सुरू झाली. लगेच सनातन ही घातक संघटना आहे. अनेक ठिकाणी झालेले बॉम्बस्फोट असो किंवा देशातील पुरोगामी विचारवंतांच्या हत्येत या संघटनेवर संशय आहे. या संघटनेवर तत्काळ बंदी आणावी, अशी मागणी समोर येऊ लागली. सनातन संस्थेने मात्र वैभव हा एक धडाडीचा गोरक्षक असून तो 'हिंदू गोवंश रक्षा समिती' या गोरक्षण संघटनेच्या माध्यमातून कार्यरत होता. हिंदू जनजागृती समितीमार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांत आणि आंदोलनांत तो सहभागी होत होता. गेल्या काही महिन्यांपासून तो कोणत्याही उपक्रमात सहभागी नसायचा, अशी माहिती हिंदू जनजागरण समिती तसेच सनातन संस्थेच्या वकिलांनी स्पष्ट केली. तो चांगला कार्यकर्ता आहे. तो अशा प्रकारचे कृत्य करू शकत नाही हे स्पष्ट करत त्याला मदत करण्याचेही सनातनने जाहीर केले आहे.



संपूर्ण महाराष्ट्राला हादरवणाऱ्या या घटनेनंतर सगळ्याच बाजूने मोठी चर्चा सर्वत्र सुरू झाली. सनातन आणि काही हिंदुत्ववादी संघटनांच्या प्रतिनिधींनी मात्र हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांना नाहक त्रास देणे, खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवणे यासारख्या घटना आता नवीन राहिलेल्या नाहीत. मालेगाव प्रकरण, सनातन संस्थेच्या अनेक निष्पाप साधकांची अटक यासारख्या प्रकरणांतून ते सिद्ध होत आले आहे. वैभवची अटक ही मालेगाव पार्ट -२ आहे का? अशी शंका येत असल्याचा संशय हिंदू जनजागरण समितीने व्यक्त केला आहे.

सनातन ही भारतातील एक जहाल हिंदू संघटना असल्याचे समजले जाते. जयंत आठवले यांनी १९९९ च्या सुमारास या संस्थेची स्थापना केली. भारतात आणि भारताबाहेर या संस्थेच्या शाखांचा विस्तार झाला.

## शब्दकोडे क्रमांक-२०



**आडवे शब्द**

१. पुरोगामी, आधुनिक विचारांचा ४. हिरव्या रंगाचा कीटक ७. साडेसातीचा अडीच वर्षांचा दुसरा टप्पा ९. काचेवरील ओरखडा १०. नित्यनेमाने केलेले वाचन ११. 'जगी हा खास वेड्यांचा --- माजला सारा' (रणदुंदुभी नाटकातील मा.दीनानाथ यांचे गाजलेले पद) १२. अडथळा, पाचर १३. आमदार-खासदारांनी घातलेल्या गोंधळासाठी रूढ झालेला शब्द १५. गंगाजल १७. कैकेयीची दासी १८. हिंदीत पैंजण २०. पहारा, रक्षण २१. अंतर्गत २२. साद २४. अनामिकेशेजारील बोट २४अ. धमनी, नाडी २५. बांबू २७. आठवड्यातील दिवस २८. तोल सांभाळण्याची कामगिरी ३०. पथारी ३३. नाहक, विनाकारण ३५. कार्तिकेयाच्या मुखांची संख्या ३६. शाहीराजवळचे वाद्य ३८. नाडी ३९. जिन्नस ४०. पद्धत ४१. एक प्रायश्चित कर्म ४२. चिंता ४४. कर्णाची उपाधी ४५. सगेसोयरे ४७. बहुपेडी साखळी ४८. वावडी, ऐकीव गोष्ट ५०. आभाळ ५१. अदृश्य ५४. पर्वत ५६. खण पण चोळीचा नव्हे ५७. पोपट ५९. बाणेदार स्त्री, जयश्री गडकर यांचा गाजलेला चित्रपट ६१. मृदंग ६३. लक्ष्मी ६४. कोर्टातील विरुद्ध पक्ष ६६. 'जैसे थे' परिस्थिती ६७. फटफजिती होईल असे ७०. बाण ७२. पाणी ओघळून जाईल असा उतार ७३. मुलगा, पुत्र ७४. एकत्रित भोजन ७५. नवलाची कामगिरी

**उभे शब्द**

१. गृहमंत्री सुनेच्या लेखी सासूबाई म्हणजे - २. प्रवाह ३. ललाट ४. दुर्लक्ष, हेळसांड ५. वाळवंट ६. अणकुचीदार ७. तोंड लपवून स्वदेश सोडण्याची वेळ आलेला ८. धनुष्यबाण ११. लुटालुट १२. हिंदीत काकडी १४. ताबडतोब पैसे मोजून १६. गौरवर्णी, साजिरी १८. स्तर १९. बारीकसारीक, किरकोळ २१. चूक, अवमान २३. उणीव, कमतरता २४. नव्या नोटेचा स्पर्श २६. काखेत मावणारी घागर २७. प्रशंसेचा उद्गार २८. सत्त्वयुक्त २९. त्वरित, अचानक ३१. हा प्रामाणिक असेल तर देशाची तिजोरी भरते ३२. गावभर स्वैर भटकणारी ३४. नातेवाईक ३७. मोबदला, परिणाम ४३. पाणी, आयुष्य ४५. हिंदीत अपवित्र ४६. कोट, किल्ला ४९. रममाण झालेला ५२. पावलोपावली, सतत ५३. पाच दिवस काम असेल तर हा देखील सुट्टीचा दिवस ५५. चांदोबाची सुट्टी! ५८. दागदागिने ६०. फार, खूप ६२. प्राप्ती, आवक ६५. घाव, प्रहार ६७. सोने ६८. उणीव पण न भासणारी ६९. राज्य ७१. ज्वाला, दाह

## थोडक्यात महत्वाचे

### पावसाचे प्रमाण घटले

**मुंबई (विशाल कारंडे)-** कोकण किनारपट्टी आणि पुणे, सातारा हे जिल्हे वगळता राज्यात इतरत्र पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा खाली गेले आहे. मध्य महाराष्ट्र व मराठवाड्याला पावसाच्या ओढीचा सर्वाधिक फटका बसला. कमी दाबाच्या पट्ट्यामुळे उत्तर भारतात पावसाने हाहाकार उडवला असतानाच आणि पूर्व किनारपट्टीवरील कमी दाबाच्या क्षेत्राने पश्चिम बंगालमध्येही पूरस्थिती असताना महाराष्ट्र मात्र पावसासाठी आसुसलेला आहे. पुढील आठवडाभरही राज्यात पावसाची शक्यता नाही. यावर्षी राज्यासह मध्य भारतात सरासरीएवढा पाऊस होईल असा अंदाज केंद्रीय वेधशाळेने जूनमध्ये जाहीर केला होता. जूनअखेर मराठवाड्यातील बुलढाणा आणि जालना तसेच विदर्भातील गोंदिया वगळता इतरत्र पावसाने सरासरी गाठली होती. त्यातच जुलैच्या पहिल्या पंधरवड्यात मराठवाडा वगळता राज्याच्या सर्व भागात पावसाने धुमाकूळ घातला. आठवडाभराहून अधिक काळ संततधार धरलेल्या पावसामुळे १८ जुलैपर्यंत बहुतांश जिल्ह्यात सरासरीपेक्षा दीडशे ते दोनशे टक्के अधिक पावसाची नोंद झाली होती.



### पोलीस सहकार्य करत नाहीत, मुंबई महापालिकेची उच्च न्यायालयाकडे तक्रार

**मुंबई (विशाल कुलकर्णी)-** शहरातील बेकायदा होर्डिंग्स उतरविण्यासाठी पोलीस सहकार्य करत नसल्याची तक्रार मुंबई महापालिकेने बुधवारी उच्च न्यायालयात केली. त्यामुळे न्यायालयाने संबंधित अधिकाऱ्यांची नावे सादर करण्याचे निर्देश महापालिकेला दिले, तर औरंगाबाद महापालिकेने उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी केली नसल्याने न्यायालयाने त्यांना 'कारणे-दाखवा' नोटीस बजावली. राज्यातील बेकायदा होर्डिंगसविरोधात सुस्वराज्य फाउंडेशनने उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेवरील सुनावणीत न्यायालयाने यापूर्वी बेकायदा होर्डिंग हटविण्याचे आदेश राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपरिषदांना दिले आहेत. या आदेशांची अंमलबजावणी कितपत करण्यात येते, हे पाहण्यासाठी महापालिकांना वेळोवेळी प्रगती अहवाल सादर करावा लागतो.



### रत्नागिरीतून लवकरच विमान वाहतूक, तटरक्ष दलाकडून चाचणी

**मुंबई (अमोल गुडेकर)-** रत्नागिरी येथील विमानतळाचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. या विमानतळाचे अत्याधुनिकीरण करण्यात येत आहे. त्यासाठी सुमारे ३०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. आतापर्यंत धावपट्टीसाठी सुमारे १०० कोटी रुपये खर्च करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली. धावपट्टीची चाचणी घेण्यात आली. तटरक्षक दलाच्या डानिय्र विमानाचे रत्नागिरीच्या धावपट्टीवर यशस्वी लँडिंग झाले. या धावपट्टीवर अजूनही काही चाचण्या घेण्यात येणार आहेत. केंद्र सरकारच्या रिजनल कनेक्टिव्हीटी स्किम अंतर्गत पहिल्या टप्प्यात रत्नागिरी विमानतळाचा समावेश झाला आहे. रत्नागिरी विमान तळावरुन लवकरच विमान सेवा सुरु होण्याचा मार्ग मोकळा झालाय.



## टाईमपास

रामू - ए राजू, तुला मी एका सेकंदात अख्खे गाणे म्हणून दाखवू?
राजू - शक्यच नाही, चल म्हणून दाखव पाहू.
रामू - गा ए ए णे!
राजू - अरे वा! चल, मीसुद्धा तुला फटाका न फोडता अगदी तुझ्या दोन्ही कानांजवळ फटाक्याचा मोठा आवाज काढून दाखवतो.
रामू - दाखव की, हे त्याचे बोलणे पूर्ण होण्याआधीच राजू त्याच्या कानांखाली पेटवतो
फाट... फाट...

पुण्यातील एक नामवंत डॉक्टर :- तुमच्या आजाराच् नेमके कारण माझ्या लक्षात येत नाही... कदाचित दारू प्यायल्यामुळे हे होत असावे.......
पेशंट :- हरकत नाही... तुमची उतरल्यानंतर येतो मी परत...!

एक उंदीर वाघाच्या लग्नामध्ये फुल जोशात नाचत असतो..,
हत्ती येतो आणि पाहुन उंदराला विचारतो, अरे तु इतका का खुश आहेस ?,
किती जोशात नाचतोयस....!!!
उंदीर म्हणतो, 'मित्रा तुला नाय कळणार ते , माझ्यालग्नाच्या अगोदर मी पण वाघ होतो'.

## सुडोकू क्रमांक-२०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | | 5 | 7 | | 1 | |
| 8 | | | 1 | 9 | | 6 | | 5 |
| 1 | 4 | | 6 | | | | | |
| | | 9 | 8 | | | 5 | | 4 |
| | | | | | | | | |
| 5 | | 3 | | | 1 | 9 | | |
| | | | | | 5 | | 4 | 2 |
| 9 | | 1 | | 2 | 8 | | | 7 |
| | 2 | | 7 | 6 | | 1 | | |




**सुविचार** आयुष्यात भेटणारी सगळीच माणसे सारखी नसतात.

## साप्ताहिक राशिभविष्य

**मेष-** आपले मन धार्मिक, अध्यात्मिककडे झुकल्याने मानसिक शांती मिळेल. जीवनसाथीकडून आपल्याला पूर्ण सहकार्य मिळेल.

**वृषभ-** व्यापारात अचानक परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. व्यापारात वाढ होईल.

**मिथुन-** मित्रांच्या सहकार्याने आपली अडकलेली काम पार पडतील. आपल्याला विशेषाधिकार प्राप्त होतील.

**कर्क-** आपल्या योजनेप्रमाणे कार्य पार पडतील. सौजन्यपूर्वक व्यवहार आपल्याला अडचणीतून वाचवील.

**सिंह-** मित्र व हितचिंताकांच्या भेटी होतील आईची तब्येत ठिक राहील. गृहोपयोगी वस्तू खरेदी करण्याचा योग चांगला चालेल.

**कन्या-** आपली बुद्धीवादी समस्या सुटेल. सुख समृद्धी वाढेल. हलगर्जीपणाची कामे टाळा. घाईगडबडीने कामे करू नका.

**तूळ-** जी कोणीही व्यक्ति आपल्या संपर्कात येईल तिला आनंदच वाटणार आहे. कामाच्या प्रती बेजबाबदार राहू नका.

**वृश्चिक-** नवीन योजना अमलात आणाल. परिवारात वातावरण चांगले राहील. आर्थिक स्थिती चांगली.

**धनु-** आवक-जावक वाढेल. चलाखीमुळे थांबलेली कामे पूर्ण होतील. यश, प्रतिष्ठा वाढेल.

**मकर-** कार्यक्षेत्रात भरभराटीचे योग आहेत. ओळख वाढेल. नवीन कामकाजामुळे आपल्याला मान मिळेल.

**कुंभ-** वाद-विवाद, भांडण तंटे होण्याची शक्यता. धंद्यात लक्ष द्या. वेळीच लक्ष न दिल्यास नुकसान होवू शकते.

**मीन-** व्यवहारात अडचणी येतील. परेशानी व धावपळ वाढेल. परिश्रमाच्या मानाने त्याचे फळ कमी मिळेल.

हे मराठी साप्ताहिक **मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक राकेश गोरे** यांनी सोमानी प्रिंटिंग, प्रेस गाला नं. ३-४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं. २,जवाहर नगर फाटक ब्रिज जवळ, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३. येथे छापून विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. १, रूम नं. ४, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. येथे प्रकाशित केले. R.N.I. NO. MAHMAR/2010/33301. Mob. 9892631863, 9892632268, 022-69998811, website:maharashatracrimetimes.com, Email-Info@maharashtracrimetimes.com maharashtracrimetimes33301@gmail.com, **कायदेशीर सल्लागार-** एडवोकेट, हाईकोर्ट मुंबई, डी. के. पांडे (बी.ए.एल.एल.बी.) हा अंक प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

## मोबाईलवर सिनेमा बनवा, सरकारी अनुदान मिळवा

**नागपूर (प्रतिनिधी)-** राज्य सरकारच्या एका निर्णयामुळे राज्यातील कानाकोपऱ्यांत असलेल्या हौशी कलाकारां एक मोठी संधी निर्माण झाली आहे. आता मोबाईलच्या कॅमेऱ्याने शूट केलेल्या नव्वद मिनिटांच्या सिनेमालाही आता राज्य सरकारचं अनुदान मिळणार आहे. चित्रपट अनुदान योजनेच्या जुन्या अध्यादेशात दोन महत्त्वाच्या अटी वगळल्यामुळे हे शक्य झाले आहे. सरकारच्या नियमांनुसार 'टू के रिझोल्युशन'मध्ये सिनेमचे चित्रीकरण केले, तर दिवसाकाठी २५ ते ३५ हजार रुपयांचा खर्च येतो. त्यात पंधरा दिवसांच्या चित्रीकरणाचे हे शेड्यूल आखायचे म्हणजे निर्मात्यांचे कंबरडेच मोडणारा प्रकार होता. त्यामुळे राज्य सरकारने २०१३ मध्ये चित्रपट अनुदान योजनेचा सुधारित अध्यादेश काढला.



## वाळूज एमआयडीसी तोडफोडीचे पंचनामे, ६० कोटींचं नुकसान, धरपकड सुरुच

**औरंगाबाद (प्रतिनिधी)-** मराठा मोर्चाच्या बंददरम्यान वाळूज एमआयडीसीत झालेल्या तोडफोडप्रकरणी जवळपास ५० कंपन्यांचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. यामध्ये कंपन्यांचे ६० कोटी पेक्षा अधिक नुकसान झाल्याचं समोर आलं आहे.पोलिसांनी कंपन्यांमधील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे धरपकड सुरु झाली आहे. वाळूज एमआयडीसीत विध्वंस करणाऱ्या ३७ जणांना आतापर्यंत अटक झाली आहे. आतापर्यंत पोलिसांनी ४७ जणांना ताब्यात घेतलं असून यातील ३७ जणांवर अटकेची कारवाई करण्यात आली आहे.प्राथमिक चौकशी झाल्यानंतर अटक झालेल्यांवर पोलिसांकडून कट कारस्थानाचा गुन्हा नोंद होण्याची शक्यता आहे.मराठा आंदोलनादरम्यान ९ ऑगस्ट रोजी ओरंगाबादमधील वाळुज एमआयडीसीत आंदोलनाला हिंसक वळण लागलं होतं. औरंगाबादमध्ये बंददरम्यान शेवटच्या टप्प्यात हिंसक वळण लागलं. या हिंसेत वाळूज एमआयडीसीतील ६० कंपन्यांचं मोठं नुकसान झालंय, तर आणखी १० ते १२ कंपन्यांचं नुकसान झाल्याची माहिती औरंगाबादमधील उद्योजक संघटनेने दिली.आंदोलकांनी कंपन्यांमध्ये घुसून मोडतोडही केली. वोक्हार्ड कंपनीच्या प्रवेशद्वाराजवळ आंदोलकांनी मोठा गोंधळ घातला. मायलॉन, स्टरलाईट या कंपन्यांवरही दगडफेक केली. आंदोलकांनी बंद कंपनीच्या गेटवर चढून आत प्रवेश केला. काही कंपन्यांचा बंद गेटची चावी सिक्युरिटीकडून काढून घेतली.



## भारतातील अमेरिकन राजदूतांना जडला साड्यांचा छंद

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)-** भारतातील अमेरिकन राजदूत मेरीके कार्लसन यांनी गेल्या वर्षी स्वातंत्र्यदिनी साडी परिधान केली होती. साडी नेसलेले चार फोटो पोस्ट करुन कार्लसन यांनी ट्विटराईट्सची पसंती जाणून घेतली आणि सर्वाधिक मतं मिळालेली साडी नेसली. मात्र त्यानंतर कार्लसन यांना साडी नेसण्याचा छंदच जडला. भारतीय संस्कृतीची भुरळ जगभरातील मोठमोठ्या नेत्यांना पडली आहे. भारतात विविधता असली तरी साडी हे वस्त्र सर्वत्र परिधान केलं जातं. विविध प्रकारच्या साड्या विविध पद्धतीने नेसल्या जातात.



अमेरिकन एम्बसीच्या राजदूत मेरीके कार्लसन यांनाही गेल्या वर्षी साडी नेसून भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करण्याची इच्छा झाली.

# गुजरातचे मुंद्रा बंदर अतिरेक्यांचे लक्ष्य?



**मुंबई (सम्यक कासारे)- गुजरातमधून अटक केलेल्या संशयित अतिरेक्याने मोबाइलमधून काढून टाकलेली छायाचित्रे हस्तगत करण्यात राज्य दहशतवादविरोधी पथक(एटीएस) आणि न्यायवैद्यक प्रयोग शाळेला यश आले आहे. त्यात गुजरातच्या मुंद्रा बंदराची सुमारे दहा छायाचित्रे आहेत. या छायाचित्रांवरून देशातील सर्वात मोठे खासगी बंदर दहशतवाद्यांच्या निशाण्यावर होते, असा अंदाज बांधून एटीएसने पुढील तपास व चौकशी सुरू केली आहे. अल्लारखा खान असे या संशयित अतिरेक्याचे नाव आहे. मे महिन्यात त्याला एटीएसने गुजरातच्या गांधीधाममधून अटक केली होती.**

या कारवाईआधी एटीएसने पश्चिम बंगालच्या विशेष कृती दलाच्या मदतीने जोगेश्वरीतून फैजल मिर्झा(३२) या पाक प्रशिक्षित संशयिताला अटक केली. त्याच्या चौकशीतून अल्लारखाचे नाव पुढे आले होते. कुख्यात गुंड छोटा शकिल याचा साथीदार आणि सध्या शारजा येथे व्यवसाय करणाऱ्या फारुख देवडीवाला याने फैजलला पाकिस्तानला धाडले होते. फैजल देवडीवालाचा आत्तेभाऊ आहे तर अल्लारखा मित्र. मुंबईत ॲपआधारित टॅक्सी सेवेत चालक म्हणून काम करणारा अल्लारखा फैजलच्या सूचनेवरून गांधीधाम येथे वास्तव्यास होता. हल्ल्यासाठीची स्फोटके किंवा अन्य आवश्यक वस्तू गुजरातेत आणण्याची जबाबदारी अल्लारखा याच्यावर होती. त्याची मुंद्रा बंदरावरली ये-जा ही हल्ल्याआधीची पाहाणी होती, असा संशय छायाचित्रे हाती लागल्यानंतर एटीएसकडून व्यक्त होत आहे. देवडीवाला शकिलच्या माध्यमातून आयएसआयच्या संपर्कात आला. भारतातील विशेषत: मुंबईतील तरुणांना शारजामार्गे पाकिस्तानात प्रशिक्षणासाठी पाठवण्याची जबाबदारी त्याने स्वीकारली होती. फैजलने पाकिस्तानातील प्रशिक्षण केंद्रात बॉम्ब(इम्प्रोवाइज्ड एक्सप्लोझीव्ह डीव्हाइस) तयार करण्यासह घातपात घडवण्याचे प्रशिक्षण घेतले होते. या छायाचित्रांसह पुढील तपासाबाबत एटीएसप्रमुख अतुलचंद्र कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी तपासातील संवेदनशील माहिती देता येणार नाही, असे सांगितले.

# केअर फाउंडेशनला समाजरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले

### समय नेशनल न्युज (डिजिटल) चा दुसरा वर्धापन दिन सोहळा उत्साहात संपन्न

**गोरेगांव-** गोरेगाव पूर्व येथील वेस्टीन हॉटेल मध्ये समय नेशनल डिजिटल न्युज चा दुसरा वर्धापन दिन सोहळा अतिशय उत्साहात पार पाडण्यात आला. या सोहळ्याच्या अनुषंगाने 'समाजरत्न पुरस्कार २०१८' चे आयोजन समय नेशनल न्युज चे मुख्य संपादक श्री. कुमार अरुण गुप्त यांच्याद्वारे करण्यात आले होते. या सोहळ्यात विविध शेत्रांमधील मान्यवरांचे त्यांच्या उत्कृष्ट व अद्वितीय समाज कार्यासाठी सन्मान करण्यात आले. कार्यक्रमास सांसद सदस्य श्री.गोपाल शेट्टी व श्री. गजानन किर्तीकर तसेच राज्य स्तरीय मान्यवरांमध्ये कॅबिनेट मिनिस्टर श्री. महादेव जानकर यांची विलक्षणीय उपस्थिती लाभली. सोबत आयकर विभागाचे जोइंत कमिशनर श्री. अखिलेंद्र यादव, धडक कामगार युनियन चे अध्यक्ष श्री. अभिजित राणे, उत्तरराज्य नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष श्री. अमित जानी हे मान्यवरही उपस्थित होते. वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाच्या शोभा उच्च स्तरावर नेणारी उपस्थिती होती ती म्हणजे 'राधे मा' यांची. सीरिअल व सिनेमा कलाकार श्री मनीष वाधवा, श्री सुनील पाल, कु. निशा दुबे व इतर काही कलाकार उपस्थित होते. विविध शेत्रांमधील मान्यवरांच्या उपस्थितीत केअर फाउंडेशन चे शुभम बर्वे, रिद्धी जैन, पूजा विश्वकर्मा, शुभम यादव, संजना यादव, वीरा जैन व वंशिका जैन यांसोबत अजय मेहत्रे या चिमुकल्या व युवा नृत्यकलाकारांनी नृत्य सादर केले. यासाठी त्यांचे समय नेशनल न्युज तर्फे गौरव करण्यात आले. पुरस्कार सोहळ्याच्या अंतिम क्षणांमध्ये केअर फाउंडेशन ला समाजरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. केअर फाउंडेशन च्या वतीने श्री. अनिकेत घनश्याम भंकाळ व श्रीमती भावना जैन यांनी पुरस्कार स्वीकारले.







## ट्रॅफिक पोलिसांना ओरिजिनल कागदपत्रं दाखवायची गरज नाही, सरकारचा निर्णय

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** केंद्र सरकारने नुकत्याच घेतलेल्या एका निर्णयानुसार यापुढे वाहनधारकांना वाहतूक पोलिसांना त्यांच्या वाहनांची मूळ कागदपत्रे दाखवणे बंधनकारक नसेल. केंद्रीय वाहतूक मंत्रालयाने वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागाला यासंबंधीचे आदेश दिले आहेत. एखादा चालक डिजिलॉकर किंवा एम



परिवहन ॲपच्या माध्यमातून वाहन परवाना, आरसी आणि इन्शुरन्सची कागदपत्रे दाखवत असेल तर ती ग्राह्य धरण्यात यावीत. त्यामुळे वाहनधारकांना गाडीची मूळ कागदपत्रे सोबत बाळगण्याची गरज नाही. अनेकदा भरधाव वेगाने गाडी चालवणे, सिग्नल तोडणे तसेच गाडी चालवताना फोनवर बोलणे अशा प्रकरणांमध्ये वाहतूक पोलीस संबंधित व्यक्तींची कागदपत्रे जप्त करतात. मात्र, कधीकधी ही कागदपत्रे पोलिसांकडून गहाळ होतात. त्यासाठी संबंधित वाहनधारकाला पुन्हा खेटे मारण्याची वेळ येते. त्यामुळे ई-डेटाबेसच्या आधारे संबंधित वाहन आणि वाहनचालकाची संपूर्ण माहिती मिळवण्याचे आदेश वाहतूक मंत्रालयाने दिले आहेत.

**यासाठी वाहनचालकांनी काय करावे?**

* मोबाईलवर डिजिलॉकर किंवा एमपरिवहन ॲप्लिकेशन डाऊनलोड करावे.
* आधार क्रमांकाच्या साहाय्याने हा नंबर ऑथेंटिकेट करावा.
* ॲप्लिकेशनवर वाहन परवाना किंवा नोंदणी क्रमांक अपलोड करावा.
* वाहतूक पोलीस मोबाईलवरुन क्यूआर स्कॅन करुन संबंधित कागदपत्रे तपासू शकतात.
* वाहनधारकाने कोणत्याही नियमाचे उल्लंघन केले असल्यास वाहतूक पोलिसांना मुख्य डेटाबेसमध्ये त्याची नोंदणी करता येईल.

## दिल्लीच्या रक्षणाची जबाबदारी महिला स्वॅट कमांडोंवर

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** दिल्लीच्या संरक्षणाची जबाबदारी आता पुरुषांच्या बरोबरीने महिला कमांडो संभाळणार आहेत. स्वॅट महिला कमांडो पथक दिल्लीच्या सुरक्षेसाठी तयार करण्यात आले असून दिल्ली हे स्वॅट महिला कमांडो पथक असलेले देशातील पहिले पोलीस दल ठरणार आहे. स्वॅट महिला कमांडोंचा केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत दिल्ली पोलीस दलात अधिकृत समावेश करण्यात येईल. या कमांडो युनिटमध्ये ईशान्य भारतातील ३६ महिलांचा समावेश करण्यात आला आहे. या ३६ महिलांना भारतीय आणि परदेशी तज्ञांच्या देखरेखीखाली अत्यंत कठोर, खडतर प्रशिक्षण देण्यात आले आहे. पुरुषांप्रमाणे अशा पद्धतीचे महिलांचे विशेष कमांडो युनिट उभारण्याची मूळ कल्पना दिल्लीचे पोलीस आयुक्त अमुल्य पटनायक यांची आहे. या पथकावर दिल्लीतील दहशतवादी करावाया रोखण्याची मुख्य जबाबदारी असेल. या महिला पुरुषांच्या तुलनेत सरस असल्याचे त्यांच्या प्रशिक्षणकर्त्यांनी सांगितल्याचे पटनायक म्हणाले.



अनेक प्रगत पाश्चिमात्य देशांनी अजून महिलांचे स्वॅट कमांडो पथक उभारलेले नसल्यामुळे ही मोठी बाब असून या महिला कमांडोंमध्ये आसाममधील १३, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम आणि मणिपूरमधील प्रत्येकी पाच महिलांचा समावेश आहे. या महिलांना भारताप्रमाणेच इस्त्रायलमध्येही प्रशिक्षण देण्यात आले आहे. या महिलांना विनाशस्त्र कसे लढायचे ते सुद्धा शिकवण्यात आले आहे.

या महिला कमांडो एमपी ५ सबमशिन गन आणि ग्लॉक २१ पिस्तुलने सुसज्ज असतील. या महिला कमांडोंची मध्य आणि दक्षिण दिल्लीतील महत्वाच्या स्थळांवर तैनाती करण्यात येईल. नागरिकांना ओलीस ठेवण्यात आले असेल तर त्यांची कशी सुटका करायची, इमारतींचे मजले कसे चढून जाण्याचे त्याचे या महिला कमांडोंना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

## माजी लोकसभा अध्यक्ष सोमनाथ चॅटर्जी यांचं निधन

**कोलकाता (पीटीआय) -** माजी लोकसभा अध्यक्ष सोमनाथ चॅटर्जी यांचं निधन झालं. किडनीच्या आजारामुळे कोलकातामधील एका खासगी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. सोमनाथ चॅटर्जी ८९ वर्षांचे होते. सोमनाथ चॅटर्जी यांना १० ऑगस्ट रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. परंतु प्रकृती गंभीर असल्याने त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवलं होतं. अखेर आज सकाळी सव्वा आठ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली.माकपचे नेते सोमनाथ चॅटर्जी हे प्रसिद्ध वकील निर्मल चंद्र चॅटर्जी यांचे पुत्र होते. निर्मल चंद्र चॅटर्जी हे हिंदू महासभेचे संस्थापक होते. सोमनाथ चॅटर्जी यांनी १९६८ मध्ये माकपसह राजकीय कारकीर्दीची सुरुवात केली आणि २००८ पर्यंत या पक्षात कार्यरत होते.



## पत्नीला सरप्राईझ द्यायला परदेशातून मुंबईत, बिल्डिंगमधून पडून तरुणाचा मृत्यू

**मुंबई (नमिता मुणगेकर)-** पत्नीला वाढदिवसाचं सरप्राईज देण्यासाठी परदेशातून आलेल्या तरुणाचा मुंबईत अपघाती मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. मूळ पुण्याच्या असलेल्या ३२ वर्षीय आयटी प्रोफेशनलचा मुंबईत सहाव्या मजल्यावरुन पडून मृत्यू झाला. पत्नीच्या वाढदिवसानिमित्त तिला सरप्राईज देण्यासाठी बेल्जियममला राहणारा तेजस दुबे मायदेशी आला. आयटी इंडस्ट्रीत कार्यरत असलेली तेजसची पत्नी पुण्यात राहते. शनिवारी तिचा वाढदिवस असल्यामुळे तेजस शुक्रवारी मुंबईत पोहचला. दुसऱ्या दिवशी कारने पुण्याला जाण्याचा त्याचा प्लान होता. शुक्रवारी रात्री तो मुंबईतील मित्र



रोहित सिन्हाकडे थांबला. तेजस आणि रोहित इंजिनिअरिंगपासून मित्र होते. सांताक्रुझला सहाव्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये रोहित भाड्याने राहतो.तेजस-रोहितचा आणखी एक मित्र तिथे आला. पहाटे तीन वाजेपर्यंत तिघं गप्पा मारत बसले होते. तिसरा मित्र पहाटे ओशिवऱ्यातील घरी निघून गेला, तर तेजस आणि रोहित बेडरुममध्ये झोपायला गेले.पहाटे पाच वाजताच्या सुमारास तेजसला जाग आली. त्याचा बेड फ्रेंच विंडोच्या बाजूलाच होता. दुर्दैवाने खिडकी उघडी होती आणि तिला बाहेरुन ग्रीलही नव्हतं. अंधारात चालताना तेजसचा तोल गेला आणि तो थेट सहाव्या मजल्यावरुन खाली पडला.

## गो हत्या करून काढला पळ, पोलीस आडवे येताच त्यांनाही उडवलं

**पुणे (अभिजीत येरल्लु)-** पिंपरी-चिंचवड परिसरातून गो-मांसाची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहन चालकाने पोलिसांना आपल्या वाहनाची धड़क देऊन जखमी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या अपघातात ३ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. सध्या त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहे. या घटनेत दीघी पोलीस कर्मचारी सूरेश शिंदे आणि त्यांचे इतर ३ सहकारी जखमी झाले आहेत. पिंपरी शहराजवळील दीघी आळंदी रोडवरील मॅगझिन चौका शेजारी असलेल्या मोकळ्या जागेत काही लोक गाईची कत्तल करून ते मांस अवैधरित्या विक्रीसाठी नेणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पण तोपर्यंत आरोपींनी पळ काढला होता.या धरपकडेमध्ये आरोपींना पकडण्यासाठी पोलीस कर्मचारी त्या वाहनाला आडवे गेले, तेव्हा संबंधित आरोपींनी पोलिसांना धड़क देऊन गाडी पुढे नेली. यात ३ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत.दरम्यान हा प्रकार लक्षात येताच ग्रामस्थ पोलिसांच्या मदतीला धाऊन आले.

## बिअरच्या बाटल्यांचं बूच बदलणाऱ्या रॅकेटचा वसईत पर्दाफाश

**वसई (विश्वास कुलकर्णी)-** दमण बनावटीच्या दारु आणि बिअर बॉटलचं बूच बदलून महाराष्ट्रात विकणाऱ्या टोळीचा पालघर जिल्ह्यात पर्दाफाश करण्यात आला. टोळीतील दोघा जणांना अटक करण्यात आली आहे. ठाणे राज्य उत्पादन शुल्क पथकाला यश आलं आहे.दोघांकडून १५ लाख ३९ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. यात तीन लाख ३९ हजार ४०० रुपयांच्या बनावट दारुचा समावेश आहे.गुजरात, दमण मधून बनावट दारु आणि बिअर महाराष्ट्रात सप्लाय केल्या जात असल्याची माहिती ठाणे राज्य उत्पादन शुल्क पथकाला मिळाली होती. ही बनावट दारु आणि बिअरचे बॉक्स भाजीपाल्याच्या टेम्पोमधून पाठवले जाणार असल्याची माहिती पथकाला मिळाली.पालघर जिल्ह्यातील चारोटी चेकपोस्टजवळ १५ दिवसांपासून त्यांनी सापळा लावला होता. एका टेम्पोची चारोटी नाक्यावर झडती घेतली असता त्यात भाजीपाला आढळून आला. मात्र आत पुन्हा पाहिलं असता या पथकाला दमणच्या बनावट दारु आणि बिअरचे १०५ बॉक्स आढळून आले.ही दारु विरार फाटा हायवेच्या बाजूला रिकामी करुन त्या ठिकाणी लेबल, बुचं बदलून महाराष्ट्राची लेबल-बुचं लावून महाराष्ट्रात विक्री केली जात असल्याची कबुली आरोपीने पथकाला दिली आहे.



